CIVIL SERVICES (MAIN) EXAM-2022

CRNA-C-MRTH

# मराठी / MARATHI

## ( अनिवार्य ) / ( Compulsory )

वेळ : **तीन तास**
Time Allowed : **Three Hours**

कमाल अंक : **300**
Maximum Marks : **300**

---

### प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

***प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा :***

*सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.*

*प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.*

*प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.*

*जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.*

*प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.*

### Question Paper Specific Instructions

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*All questions are to be attempted.*

*The number of marks carried by a question is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI** (Devanagari script) unless otherwise directed in the question.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.*

*Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

---

**Q1. खालीलपैकी कोणत्याही *एका* विषयावर 600 शब्दांत निबंध लिहा :** ***100***

(a) अक्षय ऊर्जा : शक्यता आणि आव्हाने

(b) संज्ञापनक्रांतीचे महत्त्व

(c) खेळांचे वाढते व्यावसायीकरण

(d) खानपानाचा आरोग्यावरील परिणाम

**Q2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा :** ***12×5=60***

वासाहतिक सत्ता भरमसाठ आकडेवारी आणि माहितीच्या संग्रहावर आधारित होती. इंग्रजांनी आपले व्यावसायिक व्यवहार चालवण्यासाठी व्यापारविषयक घडामोडींचा विस्तृत लेखाजोखा ठेवला होता. वाढत्या शहरीकरणातील राहणीमानाच्या स्थितिगतीवर नजर ठेवण्यासाठी ते नियमितपणे सर्वेक्षण करत होते, सांख्यिकी आकडेवारी जमा करत आणि वेगवेगळ्या प्रकारचे सरकारी अहवाल प्रकाशित करत होते.

वासाहतिक सरकारने सुरूवातीच्या काळातच नकाशे तयार करण्यावर विशेष लक्ष दिले. सरकारच्या म्हणण्यानुसार कोणत्याही स्थळाची रचना आणि भूदृश्य समजून घ्यायचे तर नकाशाची गरज असते. या माहितीच्या आधारे ते इलाख्यावर अधिक चांगले नियंत्रण स्थापित करू शकत होते. जेव्हा शहरे वाढू लागली तेंव्हा फक्त त्यांच्या विकासाच्या योजना तयार करण्यासाठी नाही तर व्यवसाय विकसित करणे आणि आपली सत्ता मजबूत करण्यासाठीसुद्धा नकाशे बनवले जाऊ लागले. शहरांच्या नकाशावरून आपल्याला त्या स्थळावरील डोंगर, नद्या व हिरवळीबाबत माहिती मिळते. या साऱ्या गोष्टी संरक्षणविषयक उद्दिष्यंसाठीच्या योजना तयार करण्यासाठीही खूप उपयोगी पडतात. याव्यतिरिक्त घाटांची ठिकाणे, घरांची सघनता आणि गुणवत्ता तसेच खत्यांची स्थिती यावरून इलाख्यातील व्यावसायिक शक्यता अजमावणे आणि करआकारणी संबंधी रणनीती तयार करण्यासाठी मदत होते.

इंग्रजांनी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी नगरपालिकेच्या वार्षिक करवसुलीच्या माध्यमातून शहरांच्या देखरेखीसाठी पैसे जमवण्याचे प्रयत्न सुरू केले होते. संघर्षा पासून वाचण्यासाठी त्यांनी

काही जवाबदाऱ्या निवडून आलेल्या भारतीय प्रतिनिधींवरही सोपवल्या होत्या. आंशिक लोक प्रतिनिधींनी युक्त नगरनिगमसारख्या संस्थांचा उद्देश शहरातील पाणीपुरवठा, निःसारण, रस्ते बांधणी आणि आरोग्य व्यवस्थांसारख्या अत्यावश्यक सेवा पुरवण्याचा होता. दुसरीकडे नगरनिगममधील घडामोडींतून नव्या प्रकारचे अभिलेखे अस्तित्वात आले ज्यांना नगरनिगमच्या अभिलेखागारात सांभाळून ठेवण्यात येऊ लागले.

शहरांच्या विस्तारावर नजर ठेवण्यासाठी नियमितपणे जनगणना केली जात होती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत विविध प्रदेशांतील कित्येक ठिकाणी स्थानिक पातळीवर जनगणना केली गेली होती. अखिल भारतीय स्तरावर जनगणनेचा पहिला प्रयत्न 1872 मध्ये केला गेला. यानंतर 1881 पासून दशवार्षिक (दर 10 वर्षांनी एकदा होणारी) जनगणना ही एक नियमित प्रक्रिया बनली आहे. भारतातील शहरीकरणाचा अभ्यास करण्यासाठी जनगणनेची आकडेवारी एक बहुमोल स्रोत आहे.

जेंव्हा आपण या अहवालांकडे पाहतो तेंव्हा असे लक्षात येते की आपल्याजवळ ऐतिहासिक परिवर्तन मोजण्यासाठीची खात्रीशीर माहिती उपलब्ध आहे. रोगराईमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या कोष्टकांची अंतहीन मालिका, किंवा वय, लिंग, जात व व्यवसायानुसार लोकांची गणना करण्याच्या व्यवस्थेतून आकड्यांचे एक विशाल भंडार मिळते, ज्यातून सटीकतेबाबत भ्रम तयार होतो. पण इतिहासकारांना असे आढळले आहे की ही आकडेवारी भ्रामकसुद्धा असू शकते. या आकडेवारीचे उपयोजन करण्यापूर्वी आपण ही बाब चांगल्या पद्धतीने समजून घेतली पाहिजे की हे आकडे कोणी एकत्र केले आहेत, आणि त्यांना का व कसे एकत्रित केले गेले होते. आपल्याला हेही माहिती करून घ्यायला हवे की कोणत्या गोष्टी मोजल्या गेल्या आणि कोणत्या गोष्टी गाळल्या गेल्या होत्या.

(a) वासाहतिक सत्ता चालवण्यासाठी आकडेवारीचे महत्त्व काय होते ? *12*

(b) वासाहतिक शासकांसाठी नकाशे का महत्त्वपूर्ण होते ? *12*

(c) वासाहतिक अभिलेख्यांच्या माध्यमातून शहरीकरणाचा अभ्यास कशाप्रकारे केला जाऊ शकतो ? *12*

(d) इतिहासकार आकडेवारीला नेहमीच संशयमुक्त का मानत नाहीत ? *12*

(e) वासाहतिक शासकांचे करांसंबंधीचे धोरण काय होते ? *12*

**Q3. खालील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा.** ***60***

साधारणपणे 'विकास' या शब्दाचा अर्थ विशिष्ट समाजाची स्थिती आणि त्याच्याद्वारे अनुभवलेल्या परिवर्तनाच्या प्रक्रियेशी जोडलेला असतो. मानवी इतिहासाच्या प्रदीर्घ अवकाशात समाज आणि त्याच्या जैव-भौतिक पर्यावरणातील अव्याहत अंतःक्रिया समाजाच्या स्थितीचे निर्धारण करतात. मनुष्य आणि पर्यावरणातील अंतःक्रियेची प्रक्रिया या गोष्टीवर अवलंबून असते की समाजाने कशा प्रकारचे तंत्रज्ञान विकसित केले आहे आणि कोणत्या प्रकारच्या संस्थांचे भरणपोषण केले आहे. तंत्रज्ञान आणि संस्थांनी मनुष्य-पर्यावरण अंतःक्रियेला गती प्रदान केली आहे, तर यातून निर्माण झालेल्या गतिमानतेतून तंत्रज्ञानाचा दर्जा उंचावला आहे आणि अनेक संस्थांची निर्मिती व कायापालट केला आहे. सारांश, विकास ही एक बहुआयामी संकल्पना आहे आणि अर्थव्यवस्था, समाज व पर्यावरणातील सकारात्मक आणि अपरिवर्तनीय बदलाचे द्योतक आहे.

विकास ही संकल्पना गतिमान आहे आणि या संकल्पनेचा प्रादुर्भाव 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात झाला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात विकासाची संकल्पना आर्थिक समृद्धीचा पर्याय होती, जिला एकूण राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न आणि दरडोई खर्चात काळानुरूप वृद्धीच्या रूपात मोजले जाते. परंतु अधिक आर्थिक वृद्धी असणाऱ्या देशांतही असमान वितरणामुळे गरीबीचा स्तर अधिक गतीने वाढला. परिणामतः 1970 च्या दशकात 'पुनर्वितरणासोबत वृद्धी' व 'वृद्धी आणि समानता' यासारख्या वाक्यांशाचा समावेश विकासाच्या व्याख्येत झाला. पुनर्वितरण आणि समानतेच्या प्रश्नांना सामोरे जाताना असा अनुभव आला की विकासाच्या संकल्पनेला फक्त आर्थिक क्षेत्रापर्यंत सीमित करता येत नाही. यात लोककल्याण आणि राहणीमानाचा स्तर, लोकांचे आरोग्य, शिक्षण, समानसंधी आणि राजकीय वा नागरी अधिकारांशी संबंधित मुद्दे सुद्धा अंतर्भूत आहेत. 1980 च्या दशकापर्यंत विकास एका बहुआयामी संकल्पनेच्या रूपाने पुढे आला, ज्यात समाजातील सर्व लोकांसाठी व्यापक स्तरावर सामाजिक व भौतिक कल्याणाचा समावेश आहे.

1960 च्या दशकाच्या शेवटी पाश्चात्त्य जगातील पर्यावरणासंबंधीच्या वाढत्या जागरूकतेतील सर्वसाधारण वृद्धीमुळे शाश्वत विकासाच्या धारणेचा उदय झाला. यातून औद्योगिक विकासातून पर्यावरणावर होणाऱ्या अनपेक्षित परिणामांबाबत लोकांची काळजी प्रकट होत होती.

पर्यावरणीय मुद्यांबाबत विश्व समुदायाची वाढती चिंता विचारात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने 'विश्व पर्यावरण आणि विकास आयोग' (WCED) स्थापन केला; ज्याची प्रमुख म्हणून नार्वेच्या पंतप्रधान गरो हरलेम ब्रंटलँड होत्या. या आयोगाने आपला अहवाल 'अवर कॉमन फ्यूचर' (ज्याला ब्रंटलँड अहवालसुद्धा म्हटले जाते) 1987 मध्ये सादर केला. WCED ने सातत्याने शाश्वत विकासाची साधी-सरळ आणि व्यापक स्तरावर उपयोगी परिभाषा मांडली. या अहवालानुसार निरंतर शाश्वत विकासाचा अर्थ आहे — 'एक असा विकास ज्यात भविष्यातील पिढ्यांच्या गरजांची पूर्तता बाधित न करता वर्तमानातील पिढीने आपल्या गरजांची पूर्तता करणे.' (333 शब्द)

**Q4. पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.** ***20***

प्रेमचंद यांनी म्हटले होते की कहाण्या तर चारी दिशांना हवेत विखुरलेल्या आहेत, प्रश्न त्यांना पकडण्याचा आहे. असे यासाठी आहे की प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक वस्तूचे आपले आपले जीवन असते, इतर सर्वांहून वेगळे. त्यात एक आरंभ, विकास आणि अंतसुद्धा असतो. प्रत्येकाची कोणती ना कोणती कहाणी असते. ज्याप्रकारे एक व्यक्ती दुसऱ्यांसारखी हू-ब-हू नसते, तशीच तिची स्वतःची जीवनकथासुद्धा दुसऱ्याशी मिळतीजुळती नसते.

अशी कोणतीच व्यक्ती नाही जी आपली कथा लिहू शकत नाही. माझी आत्मकथा माझ्या जीवनाची कथा आहे. ही केवळ माझी कथा आहे. आणि ज्या प्रमाणात माझे जीवन इतरांच्या जीवनाला स्पर्श करते त्या प्रमाणात ती इतरांचीही कथा आहे. आणि जेवढे माझे जीवन एक काळ, समाज अथवा समुहाचे प्रतिनिधीक जीवन असते, तेवढी ती सर्वांची कथा बनून जाते. प्रत्येक व्यक्तीचे जीवन कथेत परावर्तीत होण्यायोग्य आहे.

आपण लेखणी हातात घेतो आणि कागदावर काही लिहायला लागतो. सगळयात चांगले असते आपल्याच जीवनापासून सुरूवात करणे. आपल्या विषयी, बालपणापासून ते आजवर, जे जे घडले आहे ते. हीच तर आत्मकथा आहे. आत्मकथेची पहिली अट आहे उघड-उघड खरे-खरे सांगणे.

यासाठीही तयारी आवश्यक आहे. नैतिक धाडस गरजेचे आहे. जरी पूर्ण आत्मकथा नाही लिहू शकलो तरी आठवणी अथवा दैनंदिनी लिहिली जाऊ शकते. कित्येक दिवसांची-वर्षांची दैनंदिनी आत्मकथा बनून जाते.

**Q5.** **खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** **20**

Socrates was one of the celebrated Greek thinkers who became very influential in the development of Greek philosophy in particular and Western philosophy in general.

Socrates tried to bring radical changes in the society. But his attempts in the social field were not accepted and appreciated by the authorities. But convinced of his principles Socrates continued his efforts. The authorities considered him as a threat to their existence and as a result he was arrested and sent to prison. Later, he was given capital punishment because he was frank and outspoken. When he received the news of the death penalty he was not at all shaken.

It confused all the officials and even Socrates' own disciples because they had never seen a person accepting the news of his death penalty with a smiling face. When asked why so, he replied, "I have been preparing for death all my life. I have never done anything wrong to any man. That is why I am able to accept even death with a smiling face."

In his use of critical reasoning, by his unwavering commitment to truth and through the vivid example of his own life, Socrates set the standard for all subsequent Western philosophy.

**Q6.** **(a)** **खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा.** ***2×5=10***

(i) उधारीचे पोते सव्वा हात रिते. *2*

(ii) विडा उचलणे. *2*

(iii) दाती तृण धरणे. *2*

(iv) षटकर्णी होणे. *2*

(v) आधी शिदोरी मग जेजुरी. *2*

**(b)** **खाली दिलेल्या कल्पनांचा 10 वाक्यांत विस्तार करा.** ***5×2=10***

(i) म्हणी अनुभवाच्या खाणी *5*

(ii) यत्न तो देव जाणावा *5*

(c) **खाली दिलेल्या विषयावर 20 वाक्यांचा संवाद लिहा.** *10*

इतिहास पुरूषांची भेट

(d) **खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** *1×5=5*

(i) उपेक्षा *1*

(ii) काठ *1*

(iii) उपवन *1*

(iv) मोहोर *1*

(v) स्वेद *1*

(e) **खाली दिलेल्या शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** *1×5=5*

(i) अग्रज *1*

(ii) अल्लड *1*

(iii) मर्त्य *1*

(iv) कोवळा *1*

(v) कीव *1*